अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

दि.१४.०४.२०२३

# प्रेस नोट

आलोसे क्रं. १) सलीम अकबर तडवी, वय ४४,तलाठी सजा निंभोरा ता.भडगांव जि.जळगांव रा.प्लॉट नं १६ देवेंद्र नगर, संभाजी नगर रिक्षा स्टॉफजवळ, जळगांव जि.जळगांव व कविता नंदु सोनवणे,वय २७,कोतवाल सजा भोरटेक बुद्रुक ता. भडगांव जि.जळगांव रा.मठ वस्ती फाटा तांदुळवाडी, भोरटेक बुद्रुक,ता.भडगांव जि.जळगांव यांनी १,५००/– रुपये लाच रक्कमेची मागणी करुन सदर लाच रक्कम आलोसे क्र.२ यांच्या समक्ष आलोसे क्रं.१ यांनी स्वत: स्वीकारली म्हणुन गुन्हा.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | **घटक** | :– | जळगांव. |
| २ | **गुन्हा नोंद क्रमांक** | :– | भडगांव पो.स्टे. गु.र.नं.९६/२०२३ |
| ३ | **कलम** | :– | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम–७ प्रमाणे. |
| ४ | **आरोपीचे नांव व कार्यालय** | :– | १) सलीम अकबर तडवी, वय ४४,तलाठी सजा निंभोरा ता.भडगांव जि.जळगांव ह. मु.बाळद रोड, भडगांव मु.रा.प्लॉट नं १६ देवेंद्र नगर,संभाजी नगर रिक्षा स्टॉफजवळ, जळगांव जि.जळगांव **(महसुल विभाग वर्ग ३)**<br>२)कविता नंदु सोनवणे,वय २७,कोतवाल सजा भोरटेक बुद्रुक ता.भडगांव जि. जळगांव रा.मठ वस्ती फाटा तांदुळवाडी, भोरटेक बुद्रुक,ता.भडगांव जि.जळगांव **(महसुल विभाग वर्ग ४)** |
| ५ | **मागणी केलेली लाचेची तारीख व रक्कम** | :– | दि.१४/०४/२०२३ रोजी<br>१५००/–रु. लाचेची मागणी केली आहे. |
| ६ | **स्विकारलेली लाचेची रक्कम** | :– | १५००/– रुपये. |
| ७ | **गुन्हा दाखल तारीख** | :– | दि.१४/०४/२०२३ |
| ८ | **थोडक्यात माहीती** | :– | यातील फिर्यादी यांचे मयत वडील ओंकार महादु कोळी यांचे नावे मौजे भोरटेक बुा ता.भडगाव येथे शेत गट नं.१८७ मध्ये १ हेक्टर ५२ आर, तसेच गट नं ४० मध्ये २ हेक्टर २५ आर व पोटखराब क्षेत्र ०.७ आर असे एकुण २ हेक्टर ३२ आर अशी दोन ठिकाणी वेगवेगळी वडीलोपार्जित शेतजमिन आहे. फिर्यादी यांचे वडील मयत झाल्याने त्यांचे नाव सदर शेत जमीनवरुन कमी करण्यात आले नव्हते.फिर्यादी यांना सदर शेत जमीनीच्या ७/१२ उताऱ्यावरील त्यांचे मयत वडीलांचे नाव कमी करुन त्याऐवजी त्यांचेसह त्यांचे भावांची मुले,बहिण असे एकुण १० वारसांची नावे लावणे बाबत त्यांनी सन २०२२ मध्ये विहीत नमुन्यात अर्ज भरुन तो भोरटेक बु येथील तलाठी कार्यालयात सादर केला होता. त्यानंतर फिर्यादी यांनी भोरटेक बुा तलाठी कार्यालयात जाउन वारस लावणे बाबतचे प्रकरणा संदर्भात चौकशी केली असता तत्कालीन तलाठी यांनी तुमचे प्रकरण अद्याप पावेतो प्रलंबीत असुन, तुम्ही केलेल्या अर्जात तुमच्या वारसांची नावे नमुद नसुन तसे प्रतिज्ञापत्र द्यावे लागेल असे सांगीतले होते. त्यानंतर फिर्यादी यांनी दि.०३.०३.२०२३ रोजी तयार केलेले प्रतिज्ञापत्र हे दि.११.०४.२०२३ रोजी मौजे भोरटेक बुा येथील तलाठी सलीम तडवी यांचेकडेस दिले होते. तेव्हा तलाठी सलीम तडवी यांनी फिर्यादी यांना त्यांचेसह ईतर वारसांचे शेतजमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर नाव लावण्यासाठी २,५००/– रुपयांची मागणी करुन त्याचवेळी फिर्यादी यांचेकडुन १,०००/– रु घेतले होते. व उर्वरित १,५००/– रुपये दोन तिन दिवसात आणुन द्या, मग मी तुमच्या शेत जमिनीवरील तुमच्या वडीलांचे नाव कमी करुन, तुमच्यासह ईतर ०९ वारसांची ७/१२ उताऱ्यावर नोंद घेईल असे सांगीतले. त्याबाबत फिर्यादी यांनी दि.१४.०४.२०२३ रोजी ला.प्र.वि.जळगांव येथे तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीची दि.१४/०४/२०२३ रोजी ला.प्र.वि.जळगांव पथकाने दोन पंचासमक्ष पडताळणी केली असता फिर्यादी यांचे वडीलांचे नाव ७/१२ उताऱ्यावर कमी करुन देण्याच्या व फिर्यादी यांचेसह इतर ०९ वारसांची नावे ७/१२ उताऱ्यावर लावण्याच्या कामाच्या मोबदल्यात आलोसे क्रं.१ व २ यांनी फिर्यादी यांच्याकडेस १५००/–रुपयांची लाच रकमेची मागणी करुन सदर लाच रक्कम आलोसे क्रं.२ यांचेसमक्ष आलोसे क्रं.१ यांनी वर नमुद वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे कडुन पंचासमक्ष स्वत: स्विकारली म्हणुन गुन्हा. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकांबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगांव कार्यालयात संपर्क करावा.

**संपर्क पत्ता:–** अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय,जळगांव,जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,अल्पबचत भवन बिल्डींग,जळगांव.

**ईमेल आयडी:–** dyspacbjalgaon@gmail.com

**संकेतस्थळ:–** acbmaharastra.gov.in

**टोल फ्री क्रमांक:–** 1064,**दुरध्वनी क्रमांक:–**0257-2235477

**व्हॉटस्‌अॅप क्रमांक:–** 8766412529

14.04.2023

**शशिकांत श्रीराम पाटील**
**पोलीस उप अधिक्षक**
**अॅन्टी करप्शन ब्युरो, जळगांव**